The youth committee consists of Neha Sule (President Youth MBM), Ankit Joshi, Shibani Pradhan, Sahil Tadwalkar, Shivani Ballal, Sunket Kulkarni, and Anjuli Deodhare.

The theme of the party was Casino Royale. We had a great turn out, the highest amount of people to ever attend a Youth program. The event was full of games, dancing and a lot more. Everyone had a great time playing at the Poker and Roulette tables, many prizes were won and given out. All our guests had a blast dancing to our songs. DJ Yash Mohile did an excellent job playing our song requests and he enjoyed grooving to the beats with us all.

We had an appetizing Veg. and Non- Veg. dinner. It was an amazing night thanks to the EC, AC, and the youth committee of 2011 for their help. It was possible to have the first youth event such a success and raise the bars for our next events. We hope to keep bringing amazing events to MBM. Very thoughtful thanks to all the youth that showed up and enjoyed the MBM youth Valentines Party.

We hope to see all off you and many more in our future events.

Thank you!

**Neha Sule & Shivani Ballal**









# कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा




**म**राठी मंडळाच्या कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा अतिशय उत्कृष्टपणे आयोजित केल्या होत्या. मुले आणि पालक एकाच वेळी एकाच ठिकाणी आपापल्या वयोगटात हे खेळ खेळू शकले. आम्हा सर्वांना सहकुटुंब सहभाग घेता आल्यामुळे विशेष मजा आली.

कार्यक्रमाची वेळ आणि मुल्यसुद्धा अगदी योग्य होते. या अनुभवामुळे मुलांना कॉम्पुटरशिवाय बाकी खेळ सुध्दा किती मनोरंजक असतात याचा अनुभव आला. आम्हा मोठ्यांना एकमेकांच्या विशेष कलांचा सुगावा लागला. मुलांना आपल्या मित्रांमधले गुण पहायला मिळाले.

सगळीकडे उत्साहित स्पर्धेचे वातावरण दिसून आले. मंडळाचे कार्यकर्ते पूर्ण वेळ हवे नको पाहायला उपलब्ध होते. त्यांचे कौतुक करण्यासारखे काम नक्कीच त्यांनी केले. यावेळी पोटापाण्याची सोयसुद्धा छान झाली होती. मुलांसाठी मंडळाने खास पौष्टिक खाऊ, पेय आणि पालकांसाठी चहा, कॉफीची सोय केली होती.

प्रमाण पत्रे आणि अतिशय सुरेख पदके देवून मुलांचे व मोठ्यांचे कौतुक केले गेले. अगदी छोटा पण छान कार्यक्रम साजरा झाला. आम्ही सर्वजण आता वाट पहात आहोत की पुढे कोणता कार्यक्रम आखत आहेत ही मंडळी, कारण आम्ही फारच उत्सुक आहोत परत सर्वांना भेटायला आणि मनोरंजनाबरोबर मुलांना नवीन अनुभवाची चव द्यायला.



**अपर्णा चितळे**




















## अभिनंदन!

श्री. केदार व सौ. पूजा मुळगुंद ह्यांना दि. २२ फेब्रुवारी २०११ रोजी पुत्ररत्न झाले. मुलाचे नांव सोहिल ठेवण्यात आले आहे. सोहिलच्या आई–वडिलांचे व आजी–आजोबा, श्री. श्रीराम व सौ. पुष्पा मुळगुंद ह्यांचेसुध्दा हार्दिक अभिनंदन!!!

## Want to Buy or Sale Home?

**Own a Dream Home of Your Choice
Budget & Need!**



**चांगले घरकुल हवे ना?
अहो, मग विलंब कशाला?
भेटा श्रीधरला !!**

**Century 21
People's Choice
Reality Inc.**

**416 742 8000**

**Shridhar Marathe
Sales Representative**

**416 731 6597 (Cell)**
smarathe@trebnet.com

---

DELICIOUS **ALPHONSO MANGOES (HAPUS)** FROM THE FAMOUS ORCHARDS OF KONKAN ARE COMING TO THE GTA ON Saturday APRIL 23 2011.
(FORTH SEASON IN TORONTO)



**Regular size (one dozen) - $24.00/box
Payari 'Juice-Ras' Mango (one dozen)- $22.00/box if Available**

We are accepting advance orders by e-mail. No advance payment is required.
Pick up points in Mississauga and Markham.

Please e-mail your telephone number and order details to: sweet.mangoes@hotmail.com

Gulab Dhole
905 819 2995

# ॠणानुबंधदिन अर्थात व्हॅलेंटाईन डे!

मनोगाभाऱ्यातील हळुवार प्रणयरूपी स्पंदनांना हुंकार देणारा हा दिवस श्री. अजीत व सौ. सरिता कुकडे या दांपत्यांनी अचुकपणें हेरला व गेली २० वर्षे जतनही केला."तोच चन्द्रमा नभात' ह्या ओळी गुणगुणणाऱ्या प्रेमी जीवांना हरवलेल्या सोनेरी सुगंधी क्षणांचा अनुभव घेण्यासाठी एकत्रित आणून सहजीवनाचा सात्विक आनंद लुटण्यासाठीच्या प्रांजळ हेतूने कुकडे पतिपत्नींनी या दिवसाचे आयोजन १९८९ साली केले व आज १९ फेब्रूवारी २०११ रोजी ह्या प्रीतीसंगमाची पुनरावृत्ती झाली.

प्रवेशद्वारात पतीने पत्नीला पुष्पार्पण करून व्यक्त केलेली प्रेमादरयुक्त भावना कुकडे यांच्या कल्पनाशक्तीची एक चुणुक होती. सभागृहाच्या मोहक सजावटीतून त्यांच्या कलासक्त मनाची खात्री पटली.

कुकडे यांची जेष्ट कन्या सौ. संगिता पानट यांनी सूत्रसंचालनाचे शिवधनुष्य सहज पेलले व ॠणानुबंधाचे हे स्वयंवर संपन्न केले. सहजसुंदर सुस्पष्ट आवाजात अनेक खेळांचे आयोजन 'खेळ'कर निवेदनातून साकार केले. 'जामात' श्री. किरण पानट यांनी ध्वनिसंयोजनाचा कुशलतेने वापर करीत, आकर्षक प्रकाशयोजना व अवर्णनीय गीत माध्यमातून संगिताची लयलूट केली. तालबध्द, लयकारी गीतांची निवड करीत श्री. किरण यांनी प्रत्येकाला रंगमंचावर अलगद पोहोचविले.

भुकेचा ज्वालाग्नी प्रज्वलित करणाऱ्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत प्रेमीजन खेळ खेळण्यास सज्ज झाले. "स्पर्शातुन अंग अंग धुंद होऊ दे' या काव्यपंक्तीची अनुभूती देणारे खेळ कल्पकतेने आयोजित केले होते. विविध वयोगटातील प्रेमी युगुलांनी अटीतटीने खेळ खेळून रंजकता आणली. प्रणयरंगाच्या छटाही कांही खेळातून उत्कटपणें रेखाटल्या गेल्या. विविध खेळातून पति-पत्नींना नाजूक क्षणांचे साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले.

अंतरात्मा तृप्त करणाऱ्या भोजनाचा आस्वाद घेऊन उगाचच रेंगाळणाऱ्या अनेकांना पुन्हा एकदा नृत्यकक्षावर आणण्याची चुंबकीय करामत श्री. किरणच करू शकले. नृत्य करणय़ास न धजावणाऱ्या "प्रेमवीरांनी " ह्याच दिवशी पदन्यासाचा मुक्त अविष्कार दाखविला. धुंद होऊन बेभान नाचणाऱ्या या वीरांना आपल्या वयाचाही क्षणभर विसर पडला, सर्वोत्तम पेहेराव केलेल्या स्त्री पुरुषांना भेटवस्तू देऊन प्रशंसा करण्यामागचा हेतू निर्मळ होता.

"धुंद एकांत हा प्रीत आकारली, सहज मी छेडिता तार झंकारली" ह्या भावविश्वातून दोन मनांचे मीलन घडविणारा हा ॠणानुबंधाचा दिवस असा साकार झाला. शुभमंगल सहवासाचे क्षण लुटतांना प्रेमीजन पुन्हा पुढील वर्षी भेटण्याची ग्वाही देत स्वगृही परतले.

**मिलिंद गोठोस्कर....**





omnious GROUP

We cater to all occasions and events.
Just Call or email us.

Min order size: 10 people. Pick up only.
Delivery : $20 or above. Delivery charges extra.

- ✓ Daily Tiffin*
- ✓ Chaat
- ✓ Indian Gourmet
- ✓ Snacks
- ✓ Typical Maharashtrian food
- ✓ Diwali Faral

* Please call for more information

DEVIKA H. CHANDORKAR
Phone: 647-449-9641

UMESH KHARE
Phone: 647-889-7242

6 Slidell Crescent, North York
Toronto M3A 2C4

E-mail:
devika.c@omniousgroup.com
umesh.k@omniousgroup.com

Nearest Intersection:
DVP / YORK MILLS

Website: www.omniousgroup.com



Dr. Jerry Nolfi, Dr. Upen Kawale, Dr. Mira Acs & Associates

**torontoeyecare**
OPTOMETRIC CLINIC

Eye Examination
Contact Lenses
Eyeglasses
& Laser Eye Surgery Consultation

Now available: Designer Frames with an On-site Lab
1000s of Contact Lenses

Manulife Centre Concourse Level
55 Bloor Street West, Toronto, ON, M4W 1A5, (416) 966-1955
torontoeyecare.com

Voyages SKY LAWN Travel

Swati Shinde Jadhav
Conseiller voyages
Travel Consultant

433 Chabanel Ouest, Suite 111
Montréal (Quebec)
Canada H2N 2J3
swati.skylawn@gmail.com
www.skylawn.net

Tel: 514.388.1588
Fax: 514.388.2815
Cell: 514.945.5743
Toll Free: 1.877.SKYLAWN (759.5296)

spectra HOME INSPECTION

Guru Saraf
B.Arch.
416-910-0684
info@spectragta.com
www.spectragta.com

New Home Inspection - TARION
New Home pre-delivery
New Home one-year warranty
For Resale Houses
Pre-Purchase inspection
Pre-Listing resale home
Maintenance Inspection

Areas Covered:
Toronto GTA, Mississauga, Brampton, Oakville, Milton, Guelph, Markham, Richmond Hill, Ajax, Burlington.

CAHPI ONTARIO Canadian Association of Home & Property Inspectors
OAHI Associate

**REIKI**

The Art of Healing Experience the healing touch of Reiki and Learn this amazing technique from CRA registered teacher and practitioner.

Classes available 1 on 1 for Levels 1,2 & 3 followed by practice sessions to perfect an art.

**Contact**: *Surekha Joshi*

***Tel: 905 897 8516***

**Ajit and Sarita Kukade**

**Academy of Defensive Driving**
(A Division of Cook and Day Group Inc.)

5200 Finch Avenue East, Suite 210
Scarborough ON M1S 4Z4

**Business: 416-293-0786**

## आवाहन

२०११ च्या कार्यकारी समितीचा असा मानस आहे की ह्या वर्षाअखेरीपर्यंत एकूण 500.00 lbs अन्नाचे मराठी भाषिक मंडळातर्फे दान व्हावे. हे शिवधनुष्य आपणा सर्वांच्या सहकार्याशिवाय पेलणे अशक्य!

ह्या पुढील सर्व कार्यक्रमांमधे (वासंतिक, वार्षिक सहल, गणपती, दिवाळीचा कला–महोत्सव, वार्षिक सर्वसाधारण सभा आणि मुलांची Christmas Party) non-perishable food items गोळा केले जातील. तेव्हा कृपया मदत करा आणि अन्न–दानाचा हा संकल्प परिपूर्ण करा!

**कार्यकारी समिती २०११**

# पाककृती

## हैद्राबादी भरली वांगी

साहित्य: ८ लहान वांगी
१ इंच आले
५ लसणीच्या पाकळ्या
२ मध्यम आकाराचे कांदे (बारीक चिरलेले )
२ मध्यम आकाराचे टॉमेटो (बारीक चिरलेले )
अर्धा कप दाणे
पाव कप किसलेले सुके किंवा खवलेले खोबरे
दोन टेबल स्पून कोथिंबीर
१ टी स्पून तिखट
पाव चमचा हळद
१ टी स्पून धण्याची पावडर
अर्धा टी स्पून गरम मसाला
थोडे तमाल पत्र
थोडा कढीलिंब, चवीपुरते मीठ

कृती:

१. प्रथम एका भांड्यात दोन चमचे तेल गरम करुन त्यांत दाणे लालसर भाजणे. दाणे भाजल्यानंतर त्यांतच किसलेला नारळ/खवलेला नारळ घालून लालसर भाजणे आणि बाजूला ठेवणे

२. आता दुसऱ्या भांड्यात दोन चमचे तेल गरम करुन त्यांत चिरलेला कांदा, आले, लसूण व टॉमेटो मध्यम आचेवर खमंग भाजणे

३. पुन्हा एका भांड्यात ४-५ चमचे तेल घेवून त्यांत वांगी परतणे (मध्ये उभी चिरलेली). त्यांतच चवीपुरते मीठ घालणे. वांगी चांगली १०-१२ मिनिटे शिजू द्यावी

४. क्र. १ व क्र. २ चे साहित्य एकत्र करून बारीक वाटणे

५. पसरत्या भांड्यात चार ते पाच चमचे तेल गरम करणे त्यात तमाल पत्र व कढीलिंब टाकणे तसेच वाटलेले वाटण व हळद तिखट धने पूड घालून परतणे. त्यात शिजवलेली वांगी घालणे



६. रस्सा घ ` असेल तर गरम पाणी घालून सारखा करणे. कोथिंबीर घालून १० ते १५ मिनीटे मंद आचेवर ठेवणे

७. शेवटी गरम मसाला व कोथिंबीर घालून गरम गरम, चपाती किंवा भाता बरोबर वाढणे.

संयुक्ता खेर

## वडीचे सांबार

साहित्य: २ वाट्या डाळीचे पीठ
२ कांदे
२ दालचिनीचे तुकडे
४ लसणीच्या पाकळ्या
१ टीस्पून धणे
२ लवंगा
२ आमसुले
३ टेबलस्पून तेल
अर्धी वाटी बारीक किसलेले सुके खोबरे
अर्धा इंच आले, पाव वाटी नारळाचे दूध
अर्धा टीस्पून खसखस
दीड टीस्पून तिखट, अर्धा टीस्पून हळद
१ टीस्पून धणेजीरा पूड
मीठ व गुळ चवीनुसार

कृती:

आले व लसूण वाटून घ्यावेत. १ कांदा बारीक चिरावा. १ टीस्पून तेलावर तळून घ्यावा व त्यांत धणे, १ लवंग, १ दालचिनीचा तुकडा व खसखस घालून चांगला परतावा. सुके खोबरे भाजून घ्यावे. हा सगळा तळलेला मसाला एकत्र वाटावा. डाळीच्या पीठात हळद तिखट धणेजिऱ्याची पूड, खसखस, मीठ, वाटलेल्या आले-लसूण यांचे अर्धे मिश्रण व ३ वाट्या पाणी घालून एकत्र करावे. हे मिश्रण गॅसवर चांगली वाफ येईपर्यंत घाटावे. त्याचा चांगला गोळा झाला की एका ताटाला तेल लावून हा गोळा त्यावर वाटीच्या सपाट बाजूने पसरावा.

त्याच्या चौकोनी, वड्या कापाव्या. दुसऱ्या पातेलीत तेल गरम करून लवंग, दालचिनीची फ़ोडणी करावी. त्यावर कांदा टाकून गुलाबी शिजवून घ्यावा. त्यात हळद, तिखट, धणेजिऱ्याची पूड, आले, लसुणाचे उरलेले वाटण घालून चांगले परतावे. त्यात तयार केलेला तळलेला मसाला, नारळाचे दूध, आमसुले, मीठ व गूळ घालावा. चांगले उकळू द्यावे. रस्सा उकळल्यावर त्यात कापलेल्या वड्या घालून परत उकळू द्यावे. कोथिंबीर घालून सजवावे.



स्वप्ना आंबेगांवकर

# शाही पनीर

साहित्य: ३७५ ग्रॅम पनीर
१ लिटर हाफ़ ॲन्ड हाफ़ क्रिम
२०० ग्रॅम टोमॅटो गर, १ टीस्पून कसुरी मेथी
फोडणीपुरते साजुक तूप, हिंग आणि चवीपुरते मीठ



कृती: नॉनस्टिक भांड्यात साजुक तुपात जिरे व हिंग घालून खमंग फोडणी करावी. लगेच त्यात टोमॅटोचा गर घालावा. छान परतल्यावर पनीर मसाला व मीठ घालून ढवळावे. पूर्ण परतल्यावर हाफ़ ॲन्ड हाफ़ क्रिम पूर्ण पाकीट घालून सतत हलवीत दाट बदामी रंग येऊ द्यावा. लगेच बदामी आकाराचे काप केलेले पनीर त्यात घालून पुन्हा हलके ढवळत रहावे. साधारण पनीरच्या अंगाबरोबर दाट रस झाला की गॅस बंद करावा. सर्व्हिंग बौलमध्ये कसूरी मेथीने सजवा.

अतिशय झटपट तितकाच नाजूक पदार्थ तयार झाला बरं का! कोणत्याही लहान मोठ्या प्रसंगी प्रस्तुत करता येतो. परोठा, नान, भटुरे, रुमाली रोटी, किंवा साध्या फुलक्यांबरोबर सर्व्ह करा. पाहूया यंदा शाही पनीरचे कर्तव्य आहे का?

अर्चना गोठोसकर

# चिकन सफेदा

साहित्य: पांढरी चिकन (बोनलेस व्हाईट मीट),
पांढरा कांदा, पांढरी काजू पावडर,
पांढरा लसूण, पांढरं खोबर(व्हाईट कोकोनट पावडर),
पांढरं मीठ, मिरचीच्या पांढऱ्या बिया,
साजुक तूप, आल्याचा रस.

कृती: साजुक तुपावर मिरचीच्या पांढऱ्या बिया व लसणाची फोडणी देऊन, वाटलेला किंवा किसलेला पांढरा कांदा घालून ब्राउन न होऊ देता परतावे. त्यावर बोनलेस चिकनचे मीठ, आलं लसूण लावलेले मुरवलेले (मॅरिनेट केलेले) लहान तुकडे घालून चिकन फार कडक न होऊ देता शिजवावी. पांढऱ्या खोबऱ्याची पावडर व पांढऱ्या काजूची पावडर एकत्र करून पाण्यात कालवून त्यात टाका. रस्सा पातळ न करता, आल्याचा रस पिळून छान उकळी द्यावी.
गरम गरम वाढावे.

लीना देवधरे



# खजूर बर्फ़ी

साहित्य: २ वाट्या खजूर
१ वाटी अक्रोडाचा चुरा
२ टी स्पून सुके खोबरे

कृती: प्रथम खजूरची पेस्ट करणे. पेस्ट थोडी गरम करणे. त्यात अक्रोडाचा चुरा घालणे. नंतर एकत्र हलवून घेणे. तयार सारण ताटात व्यवस्थित पसरवणे. त्यावर सुक्या खोबऱ्याचा कीस पसरवणे.
मग त्याचा रोल करणे व रोल फ्रीज मध्ये थोडा वेळ ठेवणे. जरावेळाने बाहेर काढून त्याच्या पातळ वड्या कापाव्यात.

वड्या सुंदर गोल गोल दिसतात!

ह्या वड्या डाईबीटीस आणि कोलेस्ट्रोल च्या लोकांनाही उपयुक्त आहेत.

देवयानी बल्लाळ

# सुडोकु

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ९ | ४ | | | | १ |
| ७ | | ३ | | ५ | | २ | | |
| | | | | | ३ | | | ८ |
| | ५ | १ | ४ | २ | | ९ | | |
| | | ७ | | | | १ | | |
| | | ८ | | १ | ५ | ७ | ३ | |
| ५ | | | ३ | | | | | |
| | | २ | | ६ | | ४ | | ३ |
| ९ | | | | ८ | ४ | | | |



# वसंतागमन



१९८६ साली मी प्रथम उत्तर अमेरिकेत न्युयॉर्कला आले. वाटेत लंडनला १५ दिवस मुक्काम केला. तेव्हा फेब्रुवारीचे दिवस होते. त्यावेळी परदेशाचे आणि तेही आमच्या भारतावर १५० वर्षे हुकुमत केलेल्या ब्रिटिशांचे लंडन पाहण्याची उत्सुकता होती. ते पाहायला मिळाल, तिथला निसर्ग, प्रेक्षणीय स्थळे पाहता येतील तेवढी पाहिली. लंडनची जीवघेणी बोचरी थंडी कुडकुडत अनुभवली. नंतर न्युयॉर्कला एक वर्षभर राहिले. तेथील राहाणीमान पाहिले, एका वर्षात वॉशिंग्टन,नायागारा फॉल्स् अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे पाहिली आणि परतले. त्यानंतर वारंवार परदेशात राहण्याचे योग आले. नंतर एक मुलगी लग्न होऊन अमेरीकेत स्थायीक झाली आणि मी ही कॅनडाची रहिवासी झाले. जेव्हा इथलं सगळ हवामान अनुभवलं तेव्हा शाळेत शिकविलेली एक इंग्रजी कविता आठवली.

There was a naughty boy, and a naughty boy was he
He ran away to Scotland for people there to see
Then he found that the ground was as hard, that a yard was as long,
that the song was as merry,that the cherry was as red, that the door was as wooden
As in London,
So he stood in his shoes and he wondered and he wondered and he wondered.

जसे या कवितेतील छोटा मुलगा स्कॉटलंड आणि इंग्लंड मधील साम्य बघून अचंबित झाला तसे इंग्लंड, अमेरिका आणि कॅनडा हे देश बघितल्यावर मला वाटले, त्या कवितेतील सत्यता खूपच पटली. सुरुवातीला कधीही न पाहिलेल्या फॉल या ऋतुचे खूप कौतुक वाटायचे, झाडांची पाने रंग बदलून कशी रंगीबेरंगी होतात पण आता इतक्या वर्षांनी असं जाणवले कि स्प्रिंगचे महत्व आणि सौंदर्य काही निराळेच आहे. स्प्रिंगची सुरुवात होताच, अजिबात पानं नसलेली निर्जीव झाडे पाहून कंटाळलेल्या मनाला हळुवार दिलासा वाटायला लागतो. ४/५ महिने थंडीने हैराण होऊन घरी बसलेल्या शरीराला आणि मनाला थोडा आनंद वाटू लागतो. स्वच्छ उन्हानी नाहून पडण्याचा मोह आवरता येत नाही.एकदा अशीच धीर



वाढत जाऊन मी एक दिवस घराबाहेर पडले.बाहेर अंगणात ट्युलिपचे छोटे छोटे कोंब मातीतून बाहेर येतांना दिसले. ते दर दिवशी थोडे थोडे वाढतच राहिले. मग एखाद दुसरी कळी दिसू लागली व कोणत्या रंगाच्या असतील याचा अंदाज येऊ लागला आणि पाहता पाहता एकेक फुलत गेल्या. नुकतेचं जन्मलेलं तान्हें बाळ आपल्या डोळ्यासमोर दिसामासाने वाढतांना पाहण्यात आनंद वाटतो तसेच काहीसे मला वाटत होते. मी निरनिराळी फुले फुलतांना पाहात होते. बेवारशी गवतावर आपोआप उगवलेली छोटी पिवळी फुलं फुलत होती,भले त्यांना वीड म्हणून हिणवलं तरी माझ्या नेत्रांना ती सुखदाई वाटत होती म्हणून अगदी घरात आणून छोट्या फ्लॉवर पॉट्मधे रचली. अंगणातील नुसत्या फांद्या, काटक्या दिसण्याऱ्या चेरीच्या झाडाला सुंदर पांढरी फुले येत होती, बघता बघता पांढऱ्या शुभ्र फुलांनी सबंध झाड भरून गेलं, इतकं सुंदर दिसत होतं! तेंव्हा कळलं कि चेरि ब्लॉसम्‌ची वर्णन वाचली होती ती किती खरी होती. हळुहळु वाऱ्यानी पाकळ्या पडून गेल्या. त्याची पानें झाली. कोवळी पिवळी, पोपटी पाने झाडावर सुस्नात मुग्धेसारखी प्रसन्न दिसू लागली. प्रत्येक झाड वेगळ्या रंगानी बहरलेलं दिसत होत. मुलीबरोबर बाहेर पडल्यावर सगळ्या घरांसमोरची झाडे बहरलेली बघून मन थक्क झालं, हिरव्यागार गवताचें आच्छादन: मखमली गालीचा पसरावा तसा डोळ्यांना सुखावत होता. निरनिराळ्या रंगांच्या आकारांच्या



फुलांचे झुपके बघून मन अचंबित झालं. नकळत ओठावर गाणं आलं "फुलला मनी वसंत बहार".

सौ. शकुंतला मोहीले

# आजीबाईंचा बटवा



१. चांदीची सुबक भांडी आणि देव्हाऱ्यातले देव चकाकण्यासाठी घरगुती उपाय जरुर करुन पहा. दोन लिटर पाणी एका मोठ्या स्टीलच्या भांड्यात उकळणे. त्यांत दोन मोठे चमचे बेकिंग सोडा आणि ॲल्युमिनियम फॉईलचे १०–१२ तुकडे घालणे. उकळलेल्या पाण्यात चांदीची भांडी घालून थोड्यावेळ ठेवणे. पहा बरं किती छान चकचकीत भांडी होतात ती!

२. लहान मोठ्यांना सर्दी खोकला सुरु झाल्यावर लगेच आल्याचा रस आणि मधाचे चाटण दिवसातून तीनदा दिल्यास खूप आराम मिळतो. बऱ्याच अंशी सर्दी पळून जाते.

३. स्वयंपाक घरातील काळ्या पडलेल्या स्टीलच्या भांड्यांमध्ये easy-off किंवा कोणताही शेगड्या/ओव्हन साफ करणारा स्प्रे रात्री मारुन ठेवा व भांडे झाकून ठेवा. दुसऱ्या दिवशी साबणाच्या पाण्याने धुवा. भांडी चकचकीत होतील.

– जान्हवी कुलकर्णी

# मराठी शाळा

नमस्कार,

गाठले. गाठले. शतक गाठले. सप्टेंबर २०१० मध्ये मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी संख्या १०७ झाली आहे. पूर्व विभागात ३० मुले असून पश्चिम विभागात ७७ आहेत. एकूण चार वर्ग आहेत. पूर्व विभागात ज्योति मुळ्ये शिकविते. पश्चिम विभागात उमा अम्बिके, सुनंदा टुमणे व विजया मार्कंडेय शिकवितात. देवयानी बल्लाळ, वृंदा अत्रे, सुनिता जोशी ह्या सहाय्यक शिक्षक म्हणून शिकवितात. तसेच वर्गात दर शनिवारी, नंदिनी बापट, निलेश पोळ, श्रेया खासनीस, पूर्वा चितळे, चिन्मय मोरगावकर, चितळे आजोबा, अलोक बापट ही नेटाने मदतनिस म्हणून काम करतात. मराठी शाळा इयत्ता ९ वीत असलेल्या मुलांना ४० तास स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी देते.



मराठी शाळेत विविध इयत्ता, वयोगाट, आकलन शक्ती, मराठी भाषेची जाण ओळख असलेली मुले येतात. तेंव्हा एका वर्गात आम्हाला तीन गट करून शिकवावे लागते. मी तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार आम्ही शिक्षक प्रार्थना, कविता, संभाषण, लेखन वाचन शिकवितो. मोठी मुले इंग्रजीत इंटरनेट वर अभ्यासासाठी दिलेली माहिती शोधतात मग मराठीत लिहायचा स्वाध्याय करतात. मुलांकडून धडावाचन, कात्रण काम, चित्र पणत्या रंगविणे या गोष्टी देखील करतो. मे महिन्यात वार्षिक स्नेहसंमेलन असते. शाळेच्या स्थायी स्वरूपाचे कारण मराठी मंडळाचा पाठिंबा आणि पालकांचे सहकार्य व शिकविण्याची योजनबध्द पध्दत. श्री. शशांक चितळे यांनी मराठी शाळेसाठी अत्यंत सुंदर फलक तयार केला. आम्ही त्यांचे खूप आभारी आहोत. मुले नियमित पणे शाळेत येतात, मराठी बोलायला शिकतात, धीटपणे मराठी नाटुकले सादर करतात हीच शाळेच्या यशाची पावती! धन्यवाद.

सुनंदा टुमणे
मराठी शाळा संचालक

# बृहन महाराष्ट्र मंडळ

ह्या वर्षी शिकागो येथे भरवण्यात येणाऱ्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचे रजिस्ट्रेशन सुरु झाले आहे.लवकरात लवकर रजिस्टर करावे. माहितीसाठी www.bmm2011chicago.org वर जरूर पाहावे. अधिवेशनाची आकर्षणे:(भारतातून येणारे कार्यक्रम)

| | |
|---|---|
| **मराठी बाणा:** | अशोक हांडे प्रस्तुत |
| **नमन नटवरा:** | आनंद भाटे आणि मंजुशा पाटील–कुलकर्णी |
| **वाट–तिबेटची:** | डॉ.मीना प्रभू यांच्या बरोबर तिबेटची रोमहर्षक सफर! |
| **मूर्तिमंत अस्मिता:** | स्मिता पाटीलच्या बावन्नकशी कारकिर्दीच्यात उलगडून दाखवतील अश्विनी भावे आणि तुषार दळवी. |
| **तुला मी ––––मला मी:** | गिरीश कर्नाड लिखीत, विवेक लागू दिग्दर्शित, एकपाठी दीर्घांक: रंगमंचावर पुन्हा रीमा लागू |
| **चन्देरी गप्पा– गोष्टी:** | श्रेयस तळपदेशी खुसखुशीत गप्पा मारतील मुलाखतकार सुधीर गाडगीळ |
| **गारवा:** | मिलिंद इंगळे, विभावरी आपटे जोशी आणि किशोर कदम यांचा रसिकांना शब्द आणि सुरात भिजवून टाकणारा कवितांचा सूरमयी कार्यक्रम |
| **स्वप्न–स्वरांचे:** | 'सा रे ग म प' या लोकप्रिय स्पर्धेतील विजेते अजित परब, विभावरी आपटे जोशी, निहिरा जोशी, संचालन: समीरा गुजर |

लीना देवधरे

For your Home Phone Service,
Consider **Choukon**

- no contracts to sign
- keep your current phone number

Signup online at
www.choukon.com

# मनःशक्ती प्रयोग केन्द्र-- एक स्फूर्तिस्थान

मुंबई-पुणे रस्त्यावर लोणावळ्या जवळ असलेली अतिशय रम्य आणि आधुनिक अशी आगळी वेगळी आध्यात्मिक, संस्कृतिक, विज्ञानाधिष्ठित संस्था म्हणजे "मनशक्तिप्रयोग केंद्र".

परमपूज्य स्वामी विज्ञानानंद यांचा ४५ वर्षांचा अभ्यास, तप, व संशोधन ह्या आधार स्तंभावर , मनशक्ती प्रयोगकेंद्र ज्ञानपीठ उभे आहे. स्वामीजीनी धर्म, विज्ञान, तत्वज्ञान आणि व्यवहार यांची सांगड घातली आहे. रोजच्या व्यवहाराला तत्वज्ञानाची जोड देऊन आयुष्य अधिक सुखी, समाधानी कसे करावे याचे मार्गदर्शन वैज्ञानिक आणि बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून दिले. या अभ्यासावर आधारित मनःशक्तीमध्ये अनेक उपक्रम आहेत. येथे "अभ्यास, चिंतन, आणि वर्तन" ही सुत्रे महत्वाची मानली जातात. ज्ञान म्हणजे काय?

जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजून घेणे. मी आणि माझे म्हणजे काय? माझे जीवन कोणत्या नियमाने बांधले गेले आहे? सुखदुखाःचे नियम कोणते? हे नियम समजाऊन घेऊन ते प्रत्यक्षात आचरणात आणायचे आणि सुख, शांती, समाधान मिळवायचे. ते पुर्णत्वाला जाण्यासाठी माझ्या सुखदुखाःत ज्या समाजाचा फार मोठा वाटा आहे, त्या समाजापर्यंत ते ज्ञान पोहचविणे.म्हणजे माझ्यापुरता स्वार्थी, संकुचित, मर्यादित विचार न करता त्यात समाज या घटकाबद्दलही भान ठेवणे आवश्यक असते.हेच नेमके ज्ञान आणि विचार इथल्या विविध अभ्यास क्रमातून आणि मनःशक्ति या मसिकातून सर्वापर्यंत पोचविले जाते.

मनःशांतिकरता हजारोंच्या संख्येने लोक येथे येतात. ताणमुक्त व अर्थपुर्ण जीवनासाठी गर्भसंस्कारापासून,मृत्यु-पश्चात जीवनापर्यंतचे तीस प्रकाराचे अभ्यासवर्ग आणि किमान साठ ईलेक्ट्रॉनिक यंत्रे व संगणक आधारित चाचण्या (टेस्ट्स्) येथे चालु असतात. या प्रयोगकेंद्रातील "न्यू वे तत्वज्ञानाच्या" अभ्यासाने जीवनाकडे पहाण्याचा नवा दृष्टीकोन बहुतांना लाभतो.




या केंद्राची काही वैशिष्टे-

* व्यक्तिपूजा इथे केली जात नाही. कोणालाही खाली वाकून नमस्कार नाही.
* अजडवादी व जडवादी ज्ञानाचाही मुलभूत अभ्यास
* अनेक प्रथम श्रेणीचे ईंजिनीयर्स्, डॉक्टर्स् आणि शिक्षणतज्ञ व विचारवंत यांचे सहकार्य ह्या केंद्रास लाभले.
* इथल्या वाचनालयात विविध विषयांवर पांच भाषांमध्ये २५० च्या वर ग्रंथ उपलब्ध आहेत.
* समता हेच सर्व अभ्यासाचे व वागण्यातले सूत्र असे येथे मानले जाते आणि आचराणात आणले जाते.
* जाती, पक्ष, पंथ, धर्म, यातला कोणताही भेदभाव येथे केला जात नाही.
* आदिवासी आणि मागास प्रश्नांवर योजनाबद्ध कार्यक्रम आखले जातात आणि राबवण्यात येतात.
* मुलांच्यावर असणाऱ्या ताणाबद्दल येथे खास कार्य केले जाते.
* रोगमुक्तिच्या शासनमान्य उपचारांना मनःशांति उपायांची जोड दिली जाते.
* टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायंन्सिस्,डेक्कन कॉलेज, इन्डियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स इत्यादी अनेक केंद्रातील तज्ञ, रशिया व अमेरीकेतील तज्ञांशी अभ्यास संपर्क साधला जातो.
* शेकडो निःस्वार्थ कार्यकर्ते येथे अविरत काम करीत असतात.

या महाराष्ट्रात असलेल्या केंद्राला आपण सर्वांनी अवश्य भेट द्यावी आणि येथे असलेल्या ज्ञानाचा, उपक्रमांचा उपयोग जरूर करून घ्यावा.

या केन्द्राबद्दलची अधिक माहिती त्यांच्या www.manashakti.org या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

प्रल्हाद कुलकर्णी

## हेल्पलाईन

ज्येष्ठ नागरिकांना कार्यक्रमांना नेण्या-आणण्यची व्यवस्था करण्यची सोय होऊ शकेल. कृपया आपण कर्यकारिणी किंवा सल्लागार समितीशी किमान १५ दिवस अगोदर संपर्क साधावा. गरजूंना दुरध्वनी वरुन कार्यक्रमांची माहिती दिली जाईल.

सम्पर्क: प्रवीणा काळे (९०५) ७९३-८०६४

## Your "change" can make a "change"



On behalf of MBM Toronto, we wish to give a gift of knowledge by funding/adopting children in Maharashtra for their education. To fund this activity, we request you to collect the loose change that you may have at home and donate at all MBM programs in 2011.

## $ SOLD $ SOLD $ SOLD $




Contact For All Your Real Estate Needs

## Aashutosh Paluskar

***Real Estate Sales Representative***

A realtor® with Vision, Solutions & Integrity



- Free Home Evaluation
- Arrange Mortgage at Low Rates
- Free Staging Tips (Save $200)

Call : 416 200 1237

RIGHT AT HOME

www.ashpaluskar.com
ash.paluskar@gmail.com

*Office: 905 565 9200 . Direct Line: 416 200 1237*

---

AM LAW OFFICE



**ARCHANA MEDHEKAR LAW OFFICE**
**The First Marathi Law Firm in Ontario**
*providing services in;*

Family Law
Real Estate
Wills and Power of Attorney
Affidavits & Notarizations
*Legal Aid Accepted*
*First 30 minutes consultation is free*

Archana Medhekar
# 2- 4889 Dundas Street West
Toronto, ON M9A 1B2
Phone- 416 977 4204, Fax- 416 977 6352
Email- amlaw@rogers.com
www.amlaw.ca

---

# Helping you Decide the Best Rate

**Home Mortgage Loans**




## I Specialize in Business Loans

- Convenience Store
- Food Franchises
- Commercial Loan for Hotel / Motel
- Commercial Property upto 85%
- All kind of businesses upto C$250,000*

**Irrespective of Financial Status.... I can help you.**

* Case to case basis at the description of the lender and the financial status etc. of the applicant.



**CENTUM™**
Looking out for Your Best Interest™
6705 Tomken Road, Unit # 205, Mississauga ON L5T 2J6
Each Office to Independently Owned And Operated

Off: 905 795 9911
Fax: 905 507 2182
Email : geeta@geetashah.com

**GEETA SHAH**
Mortgage Agent
Lic. # M08010708
**Cell : 647 393 6876**


Providing the right auto solutions
• Pre-owned, e-tested & certified vehicles for sale
• All makes available, for every budget
• Effortless and smooth dealing
• Direct access to off-lease vehicles
• Back-up by service station
Full service station with licensed mechanics on site:
• Schedule maintenance
• Computer diagnostics
• Engine and transmission replacement
• Timing belts and water pump
• Brakes, struts and shocks
• Tune ups
. . . and many more, for all makes and models
For all your automobile needs contact:
Avadhut Joshi
416-832-0995
avadhut92@yahoo.com
Springdale Car Sales Inc.
गाडीचं काम ना... मला फोन करा आणि निर्धास्त रहा!